
# " सांगु कुणाला "



मिठु मिठु ऐकतोस माझ काम
देईन तुला पेरु, डाळींब छान ---
नेतोस कां संकेत, घे आण
अरे, कां घेतोस रे, एवढा मान ?? ----

चिऊताई, चिऊताई तू तरी ये
हृदयाच्या कुपीतील गुपित माझे ने
तुला तर विरहाचा अनुभव, गे
तरी कां करतेस, माझी गंमत, हुं ----



गुणगुणतो नुसताच कां पवना ??
आठविते मी मनात सजना
वाटतो सारा आसमंत सूना सूना
सांगणार कानात तयांच्या तू ना ?? ----

उंच उंच नकोस जाऊ रे पतंगा
उतरशील कां तयांच्या अंगणा ??
भिरभिरती ती प्रीत भावना
सांगण्यास 'कुणाला' तू आधी जाण ना !!



सौ. विजया पुरुषोत्तम जोशी.